पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- 2022-2023

# समाजशास्त्र विभाग

प्राचार्य

डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख

डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## वार्षिक अहवाल 2022- 2023

## समाजशास्त्र विभाग

समाजशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2022- 2023 मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

**अभ्यास सहल:**
महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाची अभ्यास सहल दिनांक 24 ऑगस्ट 2022 रोजी फुलंब्री येथील प्रथम ओपन स्कूल संस्थेमध्ये गेली होती. प्रथम ही एक एनजीओ असून ग्रामीण भागातील मुलांना कौशल्य शिक्षण व रोजगार देण्याचे काम करते. प्रथम संस्थेचा एक भाग म्हणून प्रथम ओपन स्कूल फुलंब्री तालुक्यामध्ये गेल्या पाच वर्षापासून काम करत आहे. प्रथम ओपन स्कूल अंतर्गत गाव पातळीवर अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत.ज्या कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम म्हणजे युथनेट. हा कार्यक्रम 50 गावांमध्ये राबविला जातो. ज्यात शिक्षण, रोजगार, आरोग्य व गावातील समस्या या विषयाला धरून ही संस्था काम पाहते.सहली दरम्यान मुलांनी प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, मोटर मेकॅनिक, नर्सिंग, ब्युटी पार्लर व सेंद्रिय शेती इत्यादी कोर्सेसची सविस्तर माहिती घेतली.अभ्यास सहलीत एकूण 15 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**अतिथी व्याख्यान:**
समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 6 सप्टेंबर 2022 रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रकाश बावस्कर (समाजशास्त्र विभाग प्रमुख, एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे कला महाविद्यालय बिडकीन, ता.-पैठण जि. औरंगाबाद) हे लाभले होते. त्यांनी समाजशास्त्र विषयातील व्यावसायिक संधी या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन:**
समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 6 सप्टेंबर 2022 रोजी सामाजिक संस्था या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन डॉ.प्रकाश बावस्कर, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. अनिल जाधव आणि विभागाचे विद्यार्थी यांच्या हस्ते झाले.

**गटचर्चा:**
समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 14 ऑक्टोबर 2022 रोजी स्त्री भ्रूण हत्या या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील गटचर्चेत 8 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सामंजस्य करार (MOU):**
प्रस्तुत महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग आणि यशवंतराव चव्हाण कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय सिल्लोड येथील समाजशास्त्र विभागाअंतर्गत दिनांक 14 नोव्हेंबर 2022 रोजी सामंजस्य करार **(MOU)**

करण्यात आला. सामंजस्य कराराद्वारे पुढील पाच वर्षासाठी विविध सामाजिक व संशोधनात्मक उपक्रम एकत्र घेण्यात येणार आहेत.

### सेमिनार:

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 21 नोव्हेंबर 2022 रोजी समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदरील सेमिनारमध्ये 6 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

### डॉ. गोविंद घुर्ये यांची जयंती:

समाजशास्त्र विभागाला डॉ. गोविंद घुर्ये यांचे नाव दिलेले असल्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त दिनांक 2 डिसेंबर 2022 रोजी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. अभिवादनास डॉ. मंजुषा नळगीरकर आणि विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. गोविंद घुर्ये यांच्या समाजशास्त्रातील योगदानाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन अभिवादन कार्यक्रम:

समाजशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित् दिनांक 6 डिसेंबर 2022 रोजी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभिवादनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### सामंजस्य करार (MOU) अंतर्गत नामविस्तार दिन कार्यक्रम:

प्रस्तुत महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड यांच्यात झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत दिनांक 14 जानेवारी 2023 रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथे नामविस्तार दिन कार्यक्रमानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. गंगाधर मोरे (उपप्राचार्य तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड) हे लाभले होते. त्यांनी विद्यापीठातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती याविषयी उपस्थित प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले.आपले विचार मांडत असताना ते म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नाम विस्तार करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. ज्या संघर्षामुळे मराठवाडा विभागाचे फार मोठे सामाजिक व आर्थिक नुकसान झाले. विद्यापीठ शिक्षण हे केवळ पदव्या देणारे असू नये तर विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व नैतिक बांधिलकी निर्माण करणारे असावे. विद्यापीठातील शिक्षणाची गुणवत्ता वाढल्याशिवाय विद्यापीठाचा नावलौकिक वाढणार नाही. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस आर टकले सर यांनी भूषविले.

### अतिथी व्याख्यान:

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 20 फेब्रुवारी 2023 रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.परसराम बाचेवाड (समाजशास्त्र विभाग, देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद) हे लाभले होते. त्यांनी विवाह संस्थेतील परिवर्तन या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 20 फेब्रुवारी 2023 रोजी सामाजिक परिवर्तन या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन डॉ. परसराम बाचेवाड, डॉ. मंजुषा नळगीरकर आणि विभागाचे विद्यार्थी यांच्या हस्ते झाले.

**गटचर्चा:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 14 मार्च 2023 रोजी सामाजिक संस्थेतील परिवर्तन या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील गटचर्चेत 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सेमिनार:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 17 मार्च 2023 रोजी कुटुंबाचे बदलते स्वरूप या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदरील सेमिनारमध्ये 5 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सामाजिक सर्वेक्षण**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात फुलंब्री गावातील शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेती बद्दल असलेला अभिप्राय या विषयावर सर्वेक्षण करण्यात आले. सदरील सर्वेक्षणात फुलंब्री गावातील एकूण 50 शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. सर्वेक्षणात तथ्य संकलनासाठी प्रश्नावली या तंत्राचा अवलंब करण्यात आला. सदरील सर्वेक्षणात चार विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. सर्वेक्षणात मिळालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

- फुलंब्री गावातील शेतकरी प्रामुख्याने कापूस, मक्का, गहू आणि भाजीपाला पिके घेतात.
- शेतकऱ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न एक ते तीन लाखा दरम्यान आहे.
- सर्वेक्षणातील एकूण 50 शेतकऱ्यांपैकी 35 म्हणजेच 70 टक्के शेतकऱ्यांकडे एक ते दोन एकर शेती आहे त्या खालोखाल 20% शेतकऱ्यांकडे तीन ते चार एकर शेती आहे व उर्वरित 10% शेतकऱ्यांकडे पाच ते सहा एकर शेती आहे.
- एकूण शेतकऱ्यांपैकी 60% शेतकऱ्यांकडे बागायती शेती आहे तर 40% शेतकऱ्यांकडे कोरडवाहू शेती आहे.
- फुलंब्री गावातील सर्वच शेतकरी रासायनिक शेती करतात. ज्यापैकी केवळ 40 टक्केच शेतकऱ्यांना रासायनिक शेतीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती आहे. त्यांनी रासायनिक शेतीमुळे शेतीची सुपीकता कमी होते, तसेच शेतीला जास्त पाणी द्यावे लागते व शेतीचा पृष्ठभाग कडक होतो असे दुष्परिणाम सांगितले.
- शेतकऱ्यांना आपण भविष्यात सेंद्रिय शेती करू इच्छिता का? असे विचारले असता, सर्वाधिक 80 टक्के शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती करू इच्छित नसल्याचे सांगितले. या मागचे कारण विचारले असता, सेंद्रिय शेतीतून उत्पन्न मिळत नाही, सेंद्रिय शेतीला अधिक खर्च लागतो आणि सेंद्रिय शेती करण्यासाठी आमच्याकडे जनावरे नाहीत अशी कारणे सांगितली.

- ज्या 20 टक्के शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी शासनाकडून काही मदतीची अपेक्षा केली आहे. ज्यात शासनाने मोफत सेंद्रिय खते द्यावीत, पारंपारिक बी बियाणांचे वाटप करावे, सेंद्रिय खते व कीटकनाशके कमी दरात उपलब्ध करून द्यावीत व सेंद्रिय शेतीतून मिळालेल्या उत्पन्नाला अधिक भाव द्यावा अशा बाबींचा समावेश आहे.
- वरील सर्वेक्षणातून एक बाब स्पष्टपणे पुढे आली ती म्हणजे, फुलंब्री गावातील शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेती विषयी फारसा सकारात्मक दृष्टिकोन नाही. शेतकऱ्यांच्या मनामध्ये ही भीती आहे की, सेंद्रिय शेतीमुळे त्यांना भरघोस उत्पन्न मिळणार नाही. परिणामी रासायनिक शेती हाच उत्पन्नाचा योग्य मार्ग आहे.असे शेतकऱ्यांना वाटते.

- **पी.पी.टी तासिका:** विभागाच्या वतीने अभ्यासक्रमाशी निगडित विविध विषयांवर 20 पी.पी.टी तासिका घेण्यात आल्या.

**उत्कृष्ट शोधनिबंध पारितोषिक:**

- समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंजुषा नळगीरकर यांना कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर जिल्हा बीड येथे दिनाक 17 फेब्रुवारी 2023 रोजी आयोजित आय.सी.एस.एस.आर प्रायोजित 75 Years of Independence and Women in India या विषयावरील राष्ट्रीय परिषदेमध्ये उत्कृष्ट शोधनिबंध पारितोषिक देण्यात आला. शोध निबंधाचा विषय होता A Study of Menstrual Health Status of Adolescent Girls in Rural Area.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

## समाजशास्त्र विभाग

## कार्यक्रमाची छायाचित्रे

### अतिथी व्याख्यान



दिनांक 6 सप्टेंबर 2022 रोजी डॉ. प्रकाश बावस्कर यांनी समाजशास्त्र विषयातील व्यावसायिक संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



दिनांक 20 फेब्रुवारी 2023 रोजी डॉ.परसराम बाचेवाड यांनी विवाह संस्थेतील परिवर्तन

या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# भित्तीपत्रक प्रकाशन




6 सप्टेंबर 2022 रोजी सामाजिक संस्था या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना डॉ. प्रकाश बावस्कर




**20 फेब्रुवारी 2023 रोजी सामाजिक परिवर्तन या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना डॉ. परसराम बाचेवाड**

# गटचर्चा




दिनांक 14 ऑक्टोबर 2022   विषय: स्त्री भ्रूण हत्या



दिनांक 14 मार्च 2023 विषय: सामाजिक संस्थेतील परिवर्तन

# सेमिनार




दिनांक 21 नोव्हेंबर 2022   विषय: समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना




दिनांक 17 मार्च 2023   विषय: कुटुंबाचे बदलते स्वरूप

<u>**सामंजस्य करार (MOU)**</u>




सामंजस्य करार करताना प्राचार्य डॉ. एस आर टकले आणि प्राचार्य डॉ.अशोक पंडित

**सामंजस्य करार (MOU) अंतर्गत नामविस्तार दिन कार्यक्रम**





**दि. 14 जानेवारी 2023 रोजी विद्यापीठातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती याविषयी विचार मांडताना प्रा. डॉ. गंगाधर मोरे**

# अभ्यास सहल

महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाची अभ्यास सहल दिनांक 24 ऑगस्ट 2022 रोजी फुलंब्री येथील प्रथम ओपन स्कूल संस्थेमध्ये गेली होती. अभ्यास सहलीत एकूण पंधरा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.









# सामाजिक सर्वेक्षण

समाजशास्त्र विभागाच्या वतीने मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात फुलंब्री गावातील शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेती बद्दल असलेला अभिप्राय या विषयावर सर्वेक्षण करण्यात आले. सदरील सर्वेक्षणात चार विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.





# डॉ. गोविंद घुर्ये यांची जयंती




2 डिसेंबर 2022 रोजी डॉ. गोविंद घुर्ये यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले




उत्कृष्ट शोधनिबंध पारितोषिक स्वीकारताना डॉ. मंजुषा नळगीरकर

# बातमी प्रसिद्धी

## सावता माळी महाविद्यालयात व्याख्यानाची सांगता

**फुलंब्री, ता. २१ (बातमीदार)** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त फुलंब्री येथील सावता माळी महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड यांच्या सामंजस्य करारांतर्गत व्याख्यान घेण्यात आले.

या व्याख्यान कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून समाजशास्त्र विभागप्रमुख

डॉ.गंगाधर मोरे हे होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.आर.टकले उपस्थित राहिले. प्रास्ताविक डॉ.मंजूषा नळगीरकर यांनी केले. "विद्यापीठातील उच्च शिक्षणाची सद्यःस्थिती" या विषयावर डॉ.मोरे म्हणाले की, प्रस्तुत विद्यापीठाला नाव देण्यासंदर्भात मोठा संघर्ष आणि सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक हानी झाली आहे. उच्च शिक्षण हे केवळ पदव्या मिळविण्यासाठी न राहता सामाजिक आणि नैतिक बांधणी करणारे असले पाहिजे. त्यासोबतच ही शिक्षण व्यवस्था गुणवत्तेला धरून असली पाहिजे. ज्यामुळे या विद्यापीठाचा नावलौकिक वाढेल.

अध्यक्षीय समारोप डॉ. टकले यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.उर्मिला ढोके या विद्यार्थिनीने केले. पाहुण्यांचा परिचय गायत्री पवार हिने करून दिला. तर उपस्थित मान्यवरांचे आभार पूनम दाभाडे हिने मानले. यशस्वितेसाठी प्रा. डॉ.मंजूषा नळगीरकर, डॉ.नितीन माळेगावकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



फुलंब्री : सावता माळी महाविद्यालयात मार्गदर्शन करताना डॉ.गंगाधर मोरे.

---

राजश्री बिकानेर
टी पॉईंट, फुलंब्री
नागोणाराय मिठाई भांडार
बसस्टँड, फुलंब्री
जयदुर्गा बिकानेर मिठाईवाला
खुलताबाद रोड, रजिस्ट्री ऑफिससमोर, फुलंब्री
आमच्याकडे सर्व प्रकारची शुद्ध मिठाई योग्य भावात मिळेल
9545880001

फुलंब्री तालुक्यातून प्रकाशित होणारे पहिले एकमेव अग्रगण्य वैचारिक, निर्भिड मराठी साप्ताहिक

साप्ताहिक **फुलंब्री समाचार**

संजय मोरे : संपादक

Reg.No. 72528/99 (Govt. Of India)

देवगिरी हॉस्पिटल अँड क्रिटीकल केअर युनिट
डॉ. श्रीकृष्ण वाकळे (जनरल फिजिशियन) डॉ. मनिषा वाकळे
खुलताबाद रोड, फुलंब्री.
मो.९४०४६१२२५३, ९०२८२०७१३०

• वर्ष २५ वे • अंक क्र. १८ • १६ ते २२ जानेवारी २०२३ • पोस्टल रजि.क्र. एबीडी/१८/२०२१-२३ • पाने ४ • किंमत १ रु.

### तुकडाबंदी उल्लंघन प्रकरणी उपविभागीय महसूल अधिकारी यांच्याकडे अपील दाखल

## फुलंब्रीत राजरोस बोगस नकाशे व तुकडाबंदीचे उल्लंघन करून नोंदणी

फुलंब्री (विशेष प्रतिनिधी) फुलंब्री येथे काही दिवसांपासून बोगस टोच नकाशे व तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन करून राजरोस नोंदणी करण्यात येत होती.

याविरोधात पत्रकार संजय मोरे यांनी नोंदणी महानिरीक्षक पुणे, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे तक्रार करून तहसिलदार फुलंब्री यांच्याकडे ५ सप्टेंबर २२ रोजी फेरफार अडवून संबंधितावर कारवाई करावी अशी तक्रार करण्यात आली होती.

मात्र तहसीलदार फुलंब्री यांनी दोन्ही पक्षकाराचे लेखी म्हणणे ऐकून घेऊन मौजे फुलंब्री येथील गट नंबर ६३७ मध्ये नोंदणी केलेल्या ११ गुंठ्याच्या तुकड्याबाबत महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम २०१७ दिनांक ०३ जानेवारी २०१८ व मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे परिपत्रक जा.क्र.२०१९/भुसुधार/तुकडेबंदी/कावि/-१ दिनांक १८/१०/२०१९ नुसार कारवाई केल्यानंतर फेरफार क्रमांक १०७८९ मंजुरी बाबत कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करावा असा आदेश दिला सदर आदेशाच्या विरोधात मा.उपविभागीय अधिकारी पैठण-फुलंब्री यांच्याकडे स्थगिती देण्याची विनंती करुन या निर्णायाच्या विरोधात ९ जानेवारी २३ रोजी अपील करण्यात आले आहे.

सध्या फुलंब्री शहरात जमीनीचे भाव गगनाला भिडले असुन त्यामुळे फुलंब्री शहरात अधिकारी व एजंटांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात नोंदणी होत आहेत. फुलंब्री शहरातील गट नंबर ६३७ मध्ये दिनांक १२/८/२०२२ रोजी १६०७/२२ या क्रमांकाचे नोंदणीकृत खरेदीखत करण्यात आले होते. हे खरेदीखत करत असताना शासनाच्या तुकडाबंदी कायद्याचा गैरवापर करुन प्रत्यक्ष ११ गुंठे भुखंडाचा टोच नकाशा न लावता गटाचा मोजणी केलेला नकाशा लावण्यात आला होता तसेच खरेदी खतांच्या २५ टक्के रक्कम शासनाला महसूल म्हणून जमा करणे आवश्यक होते. मात्र या नियमांकडे खरेदी विक्री करणाऱ्यांनी व संबंधित अधिकारी यांनी डोळेझाक करत नोंदणी केली होती

याबाबत नोंदणी महानिरीक्षक पुणे, जिल्हाधिकारी औरंगाबाद, नोंदणी मुद्रांक औरंगाबाद, यांच्याकडे तक्रार केली होती तसेच तहसीलदार फुलंब्री यांच्याकडे तक्रार दाखल केली

तहसिलदार यांनी १ जानेवारी २०२३ रोजी वरील प्रमाणे आदेश दिला या आदेशाच्या विरोधात उपविभागीय अधिकारी यांच्याकडे स्थगिती देण्याची विनंती करुन या निर्णय रद्द करुन संबंधित अधिकारी व खरेदी विक्री करणाऱ्यां विरोधात कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे

सदरील प्रकरणात तक्रारदार यांच्याकडून ॲड काजी हे काम पाहत आहेत.

## शैक्षणिक व्यवस्थेतील प्रामाणिक कर्तव्यावर लक्ष केंद्रित करावे - डॉ. गंगाधर मोरे

फुलंब्री (प्रतिनिधी) शैक्षणिक व्यवस्थेत काम करणाऱ्यांनी हक्कांबद्दल भांडण्यापेक्षा शैक्षणिक व्यवस्थेतील प्रामाणिक कर्तव्यावर अधिकचे लक्ष केंद्रित करावे असे प्रतिपादन सिल्लोड येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. गंगाधर मोरे यांनी बोलतांना केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड यांच्या सामंजस्य करारांतर्गत व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यान कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गंगाधर मोरे (समाजशास्त्र विभागप्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड) उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित राहिले.



''विद्यापीठातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती'' या विषयावर बोलत असताना डॉ.मोरे म्हणाले की, प्रस्तुत विद्यापीठाला नाव देण्यासंदर्भात मोठा संघर्ष आणि सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक हानी झालेली आहे.

याचा प्रमुख विषय म्हणजे दलित-सवर्ण संघर्ष म्हणावा लागेल. पुढे ते असेही म्हणाले की, उच्च शिक्षण हे केवळ पदव्या मिळविण्यासाठी न राहता सामाजिक आणि नैतिक बांधणी करणारे असले पाहिजे. त्यासोबतच ही शिक्षण व्यवस्था गुणवत्तेला धरून असली पाहिजे. ज्यामुळे या विद्यापीठाचा नावलौकिक वाढेल.

सद्यस्थितीत उच्च शिक्षणाची गुणवत्ता राखायची असेल तर परिक्षा पद्धतीकडे आपण डोळसपणे पाहण्याची गरज आहे. यासाठी विद्यार्थी महाविद्यालयात कसा येईल हा सकारात्मक दृष्टीकोन ठेवून आपण सर्वांनी काम करण्याची गरज आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.मंजूषा नळगीरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.मंजूषा नळगीरकर, डॉ.नितीन माळेगावकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

## धानोऱ्याच्या सोसायटीवर जय बजरंग ओम साई शेतकरी विकास पॅनलचे वर्चस्व



फुलंब्री (प्रतिनिधी) तालुक्यातील धानोरा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत जय बजरंग ओम साई शेतकरी विकास पॅनलचे सर्व ११ उमेदवार मोठ्या फरकाने विजयी झाल्याने त्यांचे वर्चस्व कायम राहिले तर विरोधी पॅनेलला दारुण पराभव पत्करावा लागला.

तालुक्यातील धानोरा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी निवडणुक नुकतीच पार पडली. या सोसायटीच्या निवडणुकीत भाजप व काँग्रेसच्या पॅनलचा धोबीपछाड देत शिंदे गटाने सोसायटी ताब्यात घेतली आहे. अर्थ व बांधकाम सभापती किशोर बलांडे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र जंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तर पॅनल प्रमुख उपसंरपच श्यामदादा साळुंखे यांच्या नेतृत्वाखालील जय बजरंग ओम साई शेतकरी विकास पॅनलने दणदणीत विजय मिळवला आहे.

जय बजरंग ओम साई शेतकरी विकास पॅनलचे फकीरबा बुनगे, आश्रूबा साळुंके, कौतिक साळुंके, तुळशीराम साळुंके, योगेश साळुंके, विलास साळुंके, संजय साळुंके, संदीप साळुंके, अंतिकाबाई साळुंके, सरसाबाई साळुंखे, चिंतामण भुईगळ आदी उमेदवार मोठे मताधिक्य घेऊन विजयी झाले आहेत.

9:48 am